सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी कार्यालय
ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Email id- cp.thane.pro@mahapolice.gov.in
Contact No.+919819208279



प्रेसनोट **दि. ०६/११/२०२५**

प्रवाशी महिलेची बॅग व सोन्याचे दागिने घेवुन पळुन गेलेल्या रिक्षा चालकास चोरी केलेल्या सोन्याचे दागिने व रिक्षासह २४ तासात केले जेरबंद

दि.३०/१०/२०२५ रोजी सिधुंदुर्ग जिल्हयातील रहिवाशी असणा–या सौ.बालीका बाळकृष्ण गवस वय ५६ वर्षे धंदा:– गृहीणी, मुळ गाव :– मुळ झरे बांबर, पोष्ट:– दोडा मार्ग, जिल्हा– सिधुदूर्ग या दिपावली सणानिमित्त टाटा पॉवर, कल्याण पुर्व व स्टार कॉलनी, डोंबिवली पुर्व येथे राहणा–याा आपल्या दोन्ही मुलीकडे फराळाचे सामान घेवुन भेटण्याकरीता आल्या होत्या.

सदर प्रवाशी महिला या स्टार कॉलनी ,डोंबिवली पुर्व येथील मुलीस भेटुन दि.३१/१०/२०२५ रोजी दुपारी ०४:०० वाजताचे सुमारास त्या त्यांचे टाटा पॉवर कल्याण पुर्व येथे राहणारे दुसरी मुलीस भेटण्याकरीता स्टार कॉलनी, डोंबिवली पुर्व येथुन प्रवासी रिक्षा पकडुन जात असताना त्यांनी रिक्षात बसलेनंतर त्यांचे गळयातील ०३ तोळे वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र त्यांचेकडील बॅगेत ठेवले होते. त्यांनतर त्या पिसवली येथील पिंगारा बारच्या समोर पोहचल्या असता रिक्षातुन खाली उतरून रिक्षा चालकाचे भाडे दिल्यानंतंर त्या आपल्या मुलीची वाट पाहत उभ्या असताना रिक्षा चालक निघुन गेला. त्यानंतर काही वेळाने प्रवासी महिलेस लक्षात आले की, सोबत घेवुन आलेल्या व रिक्षामध्ये ठेवल्या दोन बॅगा त्यापैकी काळया रंगाच्या बॅगेत ०३ तोळे वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र असलेली बॅग सहीत दुसरी बॅग अशा ०२ बॅगा हया रिक्षावाला घेवुन गेला असल्याचे त्यांचे लक्षात आले. त्यांनतर काही वेळात प्रवाशी महिलेची मुलगी त्यांना घेण्याकरीता आली तेव्हा त्यांनी सदरची हकिगत आपले मुलीस सांगितली. त्यांनतर प्रवाशी महिला व तीचे मुलीने रिक्षाचा शोध घेतला परंतु सदर रिक्षा आढळुन आली नाही. तेव्हा त्यांचे लक्षात आले की, त्या रिक्षामध्ये गळयातुन काळया रंगाच्या बॅगेत ठेवलेले ०३ तोळे वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र तसेच कपडयाचे दोन बॅगा हया रिक्षात ठेवलेले असल्याचे रिक्षा चालक यास माहिती असताना सदरच्या बॅगा हया रिक्षा चालक चोरी करून घेवुन गेला आहे.

त्यांनतर सदर प्रवासी महिला व तीचा जावई योगेश सावंत यांनी सदरबाबत गुन्हे शाखा,घटक–०३ कल्याण्य कडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांना माहिती दिली असता पोलीसांनी सी.सी.टि.व्ही फुटेजची पाहणी केली असता सदर रिक्षाचा नंबर M.H.05/C.P.3343 असा असल्याचे समजले. तदनंतर पोलीसांनी सदर रिक्षा व रिक्षा चालकाचा शोध घेतला असता तो पोलीसाना मिळुन आल्याने सदर प्रवाशी महिलेस आज रोजी गुन्हे शाखा घटक ०३ कल्याण येथे बोलाविण्यात आले त्याप्रमाणे त्या हजर झाले असता सदर प्रवाशी महिलेस रिक्षाचालक नामे जयेश वसंत गौतम वय ३२ वर्षे धंदा:– रिक्षा चालक राह:–पटवा चाळ, रूम नंबर ०२, गणेशवाडी, टिटावाळा मांडा रोड, टिटवाळा, ता.कल्याण यास बॅगेत ठेवलेले ०३ तोळे वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र दाखविले असता सदरचे दागिने व रिक्षा चालक तोच असल्याचे पोलीसांना ओळखुन सांगितले.

तरी गुन्हे शाखा,घटक–०३ कल्याण कडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातुन सिधुंदुर्ग जिल्हयातील रहिवाशी असणा–या सौ.बालीका बाळकृष्ण गवस वय ५६ वर्षे धंदा:– गृहीणी, मुळ गाव :– मुळ झरे बांबर, पोष्ट:– दोडा मार्ग, जिल्हा– सिधुदूर्ग या प्रवाशी महिलेचे चोरीस गेलेले ३,६०,०००/रूपये ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र व आरोपी रिक्षा चालक तसेच त्याचे ताब्यातील रिक्षा असा ५,२१,५५०/– रू किमतीचा मुददेमाल हस्तगत करून रिक्षा चालकास २४ तासात जेरबंद करून त्याचे विरूध्द मानपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी कामगिरी मा. श्री. आशुतोष डुंबरे पोलीस आयुक्त ठाणे शहर, मा. श्री. पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व मा. श्री. शेखर बागडे, सहा.पोलीस आयुक्त, (शोध–१) गुन्हे ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, सपोनि/सर्जेराव पाटील, सपोनि/बळवंत भराडे, पोउपनि/किरण भिसे, पोउपनि/विनोद पाटील, पोलीस अमलंदार दत्ताराम भोसले, बालाजी शिंदे, अदिक जाधव, सुधीर कदम, सचिन भालेराव, पांडुरंग भांगरे, सचिन कदम, विजय जिरे, विलास कडु, गोरखनाथ पोटे, प्रंशात वानखेडे, उल्हास खंडारे, दिपक महाजन, प्रविण किनरे, गुरूनाथ जरग, विनोद चन्ने, मिथुन राठोड, गोरक्ष शेकडे, सतिश सोनवणे, गणेश हरणे, जालिदंर साळुंखे, मंगल गावित, चालक अमोल बोरकर यांचे पथकाने केलेली आहे.
